# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date 12 January 2026
## Time 11.00 to 11.05 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १२ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आज राष्ट्रीय युवादिन साजरा केला जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वामी विवेकानंद यांना आदरांजली वाहिली. युवकांच्या नेतृत्वाखालील राष्ट्र उभारणीसाठी आंतरिक शक्ती, सेवा आणि प्रेरणा या विवेकानंदांच्या चिरंतन संदेशाचं स्मरण करत असल्याचं राष्ट्रपतींनी याबाबतच्या संदेशात म्हटलं आहे. भारतातील तरुणांसाठी विवेकानंद यांची चिरस्थायी प्रेरणा आणि विकसित भारताच्या स्वप्नाला ऊर्जा देण्यातील त्यांची भूमिका आज यानिमत्ताने अधोरेखित करत असल्याचं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, यानिमित्तानं नवी दिल्लीत आयोजित विकसित भारत युवा नेतृत्व संवाद कार्यक्रमाच्या समारोप सत्रात पंतप्रधान सहभागी होणार आहेत. यावेळी ते देशभरातून आलेल्या सुमारे तीन हजार तरुणांशी, तसंच आंतरराष्ट्रीय समुदायांच्या युवा प्रतिनिधींशी संवाद साधतील. भारताचा विकासाचा प्राधान्यक्रम आणि देश उभारणीची ध्येयं या विषयावर युवा सहभागींनी लिहिलेल्या निबंध संग्रहाचं प्रकाशनही यावेळी होईल. युवा प्रतिनिधींमधल्या निवडक सहभागींना पंतप्रधानांसमोर त्यांच्या कल्पनांचं सादरीकरण करायची संधीही मिळणार आहे.

**

राष्ट्रीय युवक दिनाच्या पार्श्वभूमीवर भारताचे अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांनी काल नवी दिल्लीत आगामी प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित राष्ट्रीय छात्र सेना – एनसीसीच्या राष्ट्रीय शिबिराला भेट दिली. देशभरातून आलेल्या युवा छात्रांशी त्यांनी संवाद साधला. आजची युवा पिढी ही देशाचं भविष्य निर्माण करणारी असून, त्यांनी अंतराळात उड्डाण करण्याच्या स्वप्नाबरोबरच इतर क्षेत्रातली मोठी स्वप्नं पूर्ण करण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करावे, असं आवाहन शुभांशु शुक्ला यांनी यावेळी केलं.

****

राजमाता जिजाऊंची आज चारशे अठ्ठावीसावी जयंती आज उत्साहात साजरी होत आहे. यानिमित्तानं बुलडाणा जिल्ह्यात सिंदखेडराजा इथं राजे लखुजी जाधव यांच्या राजवाड्यात असलेल्या जिजाऊंच्या जन्मस्थळी सूर्योदयाच्या वेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते शासकीय महापूजा पार पडली. या पवित्र सोहळ्यासाठी राज्यभरातून शिवप्रेमी आणि जिजाऊ भक्त मोठ्या संख्येने सिंदखेडराजा इथं दाखल झाले आहेत. पहाटेपासूनच राजवाडा परिसर भक्तिमय आणि उत्साही वातावरणाने फुलून गेला आहे. अनेक युवक छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशभूषेत सहभागी झाले होते, तर महिला–पुरुषांनी भगवे फेटे परिधान करून जिजाऊंना अभिवादन केलं. यावेळी राजे लखुजी जाधव यांचे वंशज शिवाजी जाधव, आमदार मनोज कायंदे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

****

साखरेच्या दरात घट झाल्याने साखर उद्योग आर्थिक अडचणीत सापडला असून, साखरेचा किमान विक्री दर प्रतिकिलो ४१ रुपये करावा, तसंच इथेनॉलचा विक्री दर वाढवावा, अशी मागणी राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाच्या वतीनं पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यासंदर्भात राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे शिष्टमंडळ लवकरच अमित शाह यांची भेट घेणार असल्याचं महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी सांगितलं.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी काल मुंबईत शिवाजी पार्क इथं संयुक्त जाहीर सभा घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांनी सत्ताधारी भाजपवर जोरदार टीका केली. सर्वपक्षीय मराठी माणसांनी राजकीय मतभेद बाजूला सारून एकत्र यावं असं, आवाहन राज ठाकरे यांनी केलं. तर मुंबईला महाराष्ट्रापासून तुटू देणार नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

****

लाडकी बहीण योजनेला काँग्रेसचा विरोध नाही, पण निवडणुका जिंकण्यासाठी भाजप या योजनेचा वापर करून घेत आहे अशी टीका, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी काल अकोल्यात केली. आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडून निवडणुका घेण्यावरूनही त्यांनी राज्य सरकार आणि निवडणूक आयोगावर निशाणा साधला.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्यावतीने सुरु असलेल्या लोककला महोत्सवाचा आज समारोप होणार आहे. रंगकर्मी गणेश चंदनशिवे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज संध्याकाळी समारोप कार्यक्रम होणार आहे. विजेत्या संघाला प्रत्येक कला प्रकारात तीन पारितोषिक तसंच सांघिक ढाल वितरण यावेळी करण्यात येणार आहे.

****

मुंबई सीमाशुल्क क्षेत्र विमानतळ आयुक्तालयानं गेल्या आठवड्यात बँकॉकहून आलेल्या प्रवाशांकडून ४५ किलोहून अधिक सुमारे ४५ कोटी किमतीचे अंमली पदार्थ जप्त केले. तसंच, दोन वेगवेगळ्या प्रकरणांत सुमारे पावणे तीन किलो सोनं जप्त करून संबंधित प्रवासी आणि त्यांना मदत करणाऱ्या विमानतळ कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली आहे.

****

सध्या राज्यात कोरडं हवामान असून, विदर्भात किमान तापमानात लक्षणीय, तर मराठवाड्यात किंचित घट झाली आहे.

****